1 आर.सी.सी. १२३/२०२०
सरकार वि. जनार्धन
निशाणी २६

<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ५ याची जबानी</u>
<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>

माझे नाव – बाळासाहेब हरीभाऊ अस्वले, वय – ६९ वर्षे,
व्यवसाय – सेवानिवृत्त, राहणार – नवलेवाडी फाटा,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –</u>

१. मी नवलेवाडी फाटा येथे श्रेया रेसिडेन्सीमधील फ्लॅट नं. १ मध्ये राहतो. मी नामदेव लांडे यांना ओळखतो. ते आमच्या रेसिडेन्सीमधील फ्लॅट नंबर ३ मध्ये राहतात. घटना दिनांक २२.०४.२०२२ रोजी सकाळी ०९:३० वाजण्याच्या सुमारास श्रेया रेसिडेन्सीच्या पाठीमागे घडली होती. घटनेच्यावेळी मी घटनास्थळी नव्हतो. माझ्या पत्नीचे नाशिक येथे केमो थेरपी चालू असल्यामुळे मी नाशिक येथे होतो. पोलीसांनी माझा जबाब घटनेनंतर दोन दिवसांनी घेतला होता.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्ष अधिनियम कायदा कलम १५७ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

<u>उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –</u>

२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पत्नीस कॅन्सर असल्यामुळे मी घरीच असायचो. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, माझ्या पत्नीस केमो थेरपी देण्यासाठी आठवड्यातून एक दिवस नाशिक येथे जातो. हे म्हणणे खरे आहे की, श्रेया रेसिडेन्सी ही जनार्दन नवले याने बांधली व फ्लॅट धारकांनी

त्याचेकडून फ्लॅट विकत घेतले. हे म्हणणे खरे आहे की, जनार्दन नवले व नामदेव लांडे यांच्यामध्ये घटनेपुर्वी भांडण होत होते.

३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २२.०४.२०२० रोजी मी फ्लॅट नं. १०१ मध्ये असताना सकाळी ०९:३० वाजता फ्लॅट नं. ३०१ मधून जनार्दन नवले व नामदेव लांडे यांच्या भांडणाचा आवाज आल्याने मी बाहेर आलो. हे म्हणणे खरे नाही की, जनार्दध नवले हा जिन्याने खाली जात असल्याचे मी पाहीले. हे म्हणणे खरे नाही की, मी फ्लॅट नं. ३०१ मध्ये जावून पाहीले असता नामदेव लांडे हे पडलेले होते व त्यांच्या तोंडातून रक्त येत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी त्यांची पत्नी व मुलगा सुदर्शन हा त्यांच्या जवळ होता.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी विचारणा केली असता मला नामदेव लांडे यांची पत्नी व मुलाने सांगितले की, फ्लॅटमध्ये पिण्याचे पाणी न आल्याने नामदेव लांडे हे स्वत: टेरेसवर पाण्याची टाकी भरलेली नव्हती त्याची पाहणी केली असता टाकीचा कॉक काढून घेतलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, पुढे त्यांनी मला सांगितले की, जनार्दन नवले यास त्यांनी विचारले की, टाकीत पाणी का पडले नाही, असे विचारले असता त्याने तुम्हाला काय करायचे ते करा, टाकीत पाणी पडणार नाही असे म्हणाला. हे म्हणणे खरे नाही की, पुढे त्यांनी सांगितले की, नामदेव लांडे हे त्यांच्या फ्लॅट नं. ३०१ मध्ये निघून आले. हे म्हणणे खरे नाही की, पुढे त्यांनी मला सांगितले की आरोपी हा त्यांच्या पाठीमागे येवून त्यांना दमबाजी करू लागला. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीची पत्नी उज्वला हिने आरोपीस समजावून सांगितले की, तु आम्हाला त्रास का देतो. हे म्हणणे खरे नाही की, जनार्दन नवले याने त्याचा हात उचलून मारत असताना उज्वला यांच्या

हाताला लागून त्यांच्या बांगड्या फुटल्या. हे म्हणणे खरे नाही की, जनार्दन लांडे सोडवण्यासाठी आले असता आरोपीने घरात घुसून हाताने नामदेव लांडे यांच्या तोंडावर मारून त्यांचा दात पाडला व त्यामुळे त्यांच्या तोंडातून रक्त येवू लागले. हे म्हणणे खरे नाही की, ते पाहून आरोपी तेथून पळून गेला. हे म्हणणे खरे आहे की, अशी हकिगत नामदेव लांडे याने मला सांगितली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' मी पोलीसांना सांगितला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. बी. व्ही. मोरे यांच्या मार्फत**

५. हे म्हणणे खरे नाही की, घटनेपुर्वी जनार्दन नवले व नामदेव लांडे यांच्यामध्ये माझेसमक्ष कधीही भांडण झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी व जनार्दन लांडे एकाच ठिकाणी राहत असल्यामुळे आमच्यामध्ये प्रेमाचे संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी जनार्दन नवले व नामदे लांडे यांच्यामधील भांडण कधीही पाहीलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना जबाब दिलेला नाही.

उलटपास पुर्ण.
फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.01.17 17:40:07 +0530

दिनांक १७.०१.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.